| MHKO050001352024 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.२२/२०२४ मधील नि.क्र.२४ वरील आदेश</u>**<br>**<u>दिलीप तुकाराम सावंत विरुध्द मंगला आनंदराव सावंत व इतर.</u>** |
|---|---|

प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दि.२०/०१/२०२५ रोजी **नि.क्र.२२** वर पारीत झालेला आदेशानुसार कॉस्ट रक्कम रुपये ५००/- भरुन घेण्यासाठी दाखल केला आहे. त्यावर प्रतिवादीने म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश पारीत करण्याची विनंती केली.

२. युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुत दावा हा वाटप होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र.२ विजय आनंदराव सावंत यांना प्रतिवादी क्र.५ अनुष्का विजय सावंत यांचे वडील अ.पा.क. म्हणून नेमण्याकरिता व त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याकरीता **नि.क्र.२२** वर अर्ज दाखल केला होता. माझे मा.पुर्वपिठासिन अधिकारी यांनी सदरचा अर्ज दि.२०/०१/२०२५ रोजी रक्कम रु.५००/- च्या कॉस्टसह मंजूर केला होता. परंतु, अनेक संधी देऊन सुध्दा वादी यांनी कॉस्टची रक्कम भरली नाही. परंतु असे जरी असले तरी सदर वादी यांना नैसर्गिक न्यायतत्वास अनसरुन संधी देणे गरजेचे आहे. एकंदरीत सदर अर्जात नमूद केलेले कारण व कायदेशीर बाब विचारात घेता सदर वादी यांना त्यांच्या बचावाची संधी देणे आवश्यक आहे. तसेच वादी यांनी सदर अर्ज दाखल करण्यास केलेल्या विलंबासाठी **नि.क्र.२२** वर पारीत झालेल्या आदेशानुसारच्या कॉस्टसहित अतिरिक्त रक्कम रुपये २००/- कॉस्ट मंजुर करणे न्यायाचे दिसते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

वादी यांना अर्ज **नि.क्र.२२** वर झालेली रक्कम रु.५००/– कॉस्ट व सदर अर्ज **नि.क्र.२४** करिता रक्कम रु.२००/– अशी एकूण रक्कम रु.७००/– (एकूण रक्कम रुपये सातशे) कॉस्ट प्रतिवादी यांना देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

REENA DEEPAK KHARATE
Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2025.07.28 11:17:25 +0530

**(आर. डी. खराटे)**

दि.२४/०७/२०२५.
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, इचलकरंजी.